MHWS070017092024

दाखल दिनांक : १०/०९/२०२४
नोंदणी दिनांक : १०/०९/२०२४
न्यायनिर्णय दिनांक : १२/०६/२०२६
कालावधी : ०१वर्ष ०९म. ०२दि.

**कारंजा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : पी. डी. देवरे)

## न्या य नि र्ण य

**(दिनांक १२ जून २०२६ ला घोषित)**

**सं.फौ ख.क्र. १०१४/२०२४** **निशाणी क्र. १६**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | प्रथम खबर अहवाल/ गुन्हा व पोलीस ठाणे तपशील |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा धनज बु., पोलीस ठाणे, ता. कारंजा (लाड), जि. वाशिम. गु.र.न.२६१/२०२४ |
| **अभियोग पक्षाचे मा. विधीज्ञ** | सहा. सरकारी अभियोक्ता – श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे. |

| | |
|---|---|
| आरोपी | **संजय गणपतराव खरबळकर**<br>वय : ४९ वर्ष, व्यवसाय: शेती<br>रा. धनज खुर्दे, ता. कारंजा, जि. वाशिम |
| आरोपीचे मा. विधीज्ञ | श्री. एम. सी. खंडारे |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | १०/०८/२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १०/०८/२०२४ |
| दोषारोपपत्र दिनांक | १०/०९/२०२४ |
| गुन्हयाचा सारांश निश्चित केल्याचा दिनांक | ०८/०९/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०९/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयास राखीव ठेवल्याचा दिनांक | लागू नाही |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | १२/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | लागू नाही |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला न्यायाधीन बंदी कालावधी** |
| **१.** | **संजय गणपतराव खरबळकर** | कलम ४१(१) नुसार समजपत्र देण्यात आले | – | कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | निरंक | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक १२ जून २०२६ ला घोषित)

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

### <u>अभियोग पक्षाचे वाद प्रकरण थोडक्यात खालीलप्रमाणे –</u>

२. पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हा शाखा, वाशिम यांच्या आदेशाने दिनांक १०/०८/२०२४ रोजी फिर्यादी प्रविण शिरसाट, पो.हे.कॉ. स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी पो.हे.कॉ./१९१ गजानन अवगळे, पो. ना./११८४ गजानन गोटे, म.पो.ना./४८० तेजस्विनी खोडके, चा. पो. ना. /११४९ संदिप, पोहवा/१२४०

गजानन वर व पंच असे मिळून गुप्त बातमीतील ठिकाणी १६.१५ वाजताच्या दरम्यान कारवाईसाठी गेले असता आरोपी हा ग्राम धनज खुर्द गावातील गणपती मंदीराजवळील पश्चिममुखी असलेल्या घरामध्ये त्याच्या ताब्यात देशी दारु बॉबी संत्राच्या १८० मि.ली.च्या ४८ सिलबंद बाटल्या किंमत रुपये ३३६०/– अवैद्यरित्या विक्रीसाठी बाळगताना मिळून आला. फिर्यादी यांनी त्या बाटल्या पंचासमक्ष जप्त करुन त्यांचा जप्ती पंचनामा केला. पंचनामा करताना त्या बाटल्यांमधून एक १८० मि.ली.ची बाटली रासायनिक विश्लेषण नमुन्यासाठी घेवून त्यावर त्यांच्या व पंचांच्या सहयांचे लेबल लावले. उर्वरित दारू मुद्देमाल कक्षात दाखल करणेकामी राखुन ठेवला. त्यांनी तेथे पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी धनज बु. पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द धनज बु. पोलीस स्टेशन, ता. कारंजा येथे गु.र.क्र. २६१/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ., गजानन वर यांनी केला. तपासाअंती पुरावा मिळून आल्याने त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपीविरुध्द निशाणी ०८ वर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) करिता गुन्हयाचा सारांश नोंदविला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व वाद प्रकरणाची गुणदोषांवर संपरीक्षा व्हावी अशी मागणी केली.

५. आरोपीवरील आरोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने न्यायनिर्णयाच्या भाग–क मधील साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

६. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होईल अशी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर आली नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविले नाही.

७. मी अभियोगपक्षाकरीता मा. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे यांचा व आरोपी करीता मा. विधीज्ञ श्री. एम. सी. खंडारे यांचा युक्तिवाद ऐकला.

८. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा व बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आलेले युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे निर्णयाकरीता येतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १०/०८/२०२४ रोजी १६.१५ वाजताच्या दरम्यान धनज बु., ता. कारंजा, जि. वाशिम येथे आरोपीच्या ताब्यात विनापरवाना बेकायदेशीररित्या १८० मि.ली. बॉबी संत्रा कंपनीच्या देशी दारुच्या ४८ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या व आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला? | **नाही** |
| **२.** | आदेश काय? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**!! का र ण मी मां सा !!**

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

९. आरोपीविरुध्द निर्धारीत केलेला गुन्हयाचा सारांश सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने दोन पंच साक्षीदारांस तपासले.

१०. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ गजानन विठ्ठलराव इंगळे व सा. क्र. ०२ नागेश ओंकार इंगळे, घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच यांच्या पुराव्यात असे आले आहे

की, दिनांक १०/०८/२०२४ रोजी पोलीसांनी धनज खुर्द, ता. कारंजा येथे त्यांच्या समक्ष दारुबंदी गुन्हयाकामी कोणताही छापा टाकला नव्हता. तेथे पोलिसांनी त्यांचेसमक्ष आरोपीच्या ताब्यातून बॉबी संत्रा देशीदारु जप्त केली नाही. तसेच दारु जप्तीचा व घटनास्थळाचा एकत्रित पंचनामा केला नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाकार्य करत नसल्यामुळे मा.सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासासारखे सूचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही.

११. वेळोवेळी संधी देवूनही संबंधित पोलीस स्टेशन इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवू शकले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१२. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन असे निष्पन्न होते की, आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने घटनास्थळ व जप्ती पंच यांची साक्ष नोंदवलेली आहे. घटनास्थळ व जप्ती सिध्द करण्यासाठी जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार तपासलेले असले तरी सदर त्रयस्थ पंच साक्षीदारांनी त्यांचेसमक्ष दारुबंदी गुन्हयाकामी छापा टाकून घटनास्थळ व जप्तीचे पंचनामे केल्याचे व जप्त मुद्देमालातून रासायनिक विश्लेषनासाठी नमुना घेतल्याचे अभियोगपक्षाचे कथन नाकारलेले आहे. त्यामुळे पंचनामा व जप्ती संशयापलिकडे शाबीत होत नाही. सदर प्रकरणात न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडील अहवाल अभिलेखावर दाखल असला तरी रासायनिक विश्लेषणासाठी नमुना घेवुन जाणारे संबंधित कर्मचाऱ्याची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. एकंदर अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी सिध्द केला नाही असे या न्यायालयाचे स्पष्ट मत आहे.

१३. वरील विवेचनावरुन या न्यायालयाचे असे मत आहे की, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द संशयाच्या पलिकडे जावून गुन्हा शाबित केलेला नाही. अर्थातच संशयाचा फायदा हा नेहमीच आरोपीला मिळत असतो. म्हणून मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र. २ करिता –**

१४. अभियोगपपक्ष आरोपीविरुध्द असलेला गुन्हयाचा सारांश महत्त्वाच्या पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहे. जोपर्यंत आरोपीविरुध्द आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत कायदा आरोपीस निरपराध समजतो. आरोपीचा तो संविधानात्मक हक्कही आहे. करिता आरोपी सदर गुन्हयातून मुक्त होण्यास पात्र आहे.

१५. सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल देशी दारु बॉबी संत्राच्या ४८ सिलबंद बाटल्या १८० मि.ली. प्रत्येकी यांच्यापैकी एक बाटली प्रयोगशाळा नमुन्याकामी पाठविल्याचे दोषारोपपत्रात नमुद आहे. त्यामुळे उर्वरित ४७ सिलबंद बाटल्या १८० मि.ली. प्रत्येकी यांचा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्याबाबत आदेश करणे न्यायोचित ठरेल.

१६. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ (१) चे पुर्ततेकामी जामीन दिलेला आहे. सबब मी मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष नकारार्थी देऊन मुद्दा क्र. ०२ करिता खालील आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये आरोपी संजय गणपतराव खरबळकर यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल देशी दारु बॉबी संत्राच्या एकूण ४७ सिलबंद बाटल्या १८० मि.ली. प्रत्येकी यांचा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात याव्या.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पुर्ततेकामी दाखल केलेले जामीन बंधपत्र खटल्याच्या न्यायनिर्णयापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.06.12 17:52:16 +0530

(**पी. डी. देवरे**)

दिनांक: १२/०६/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड).

**भाग 'क'**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | गजानन विठ्ठलराव इंगळे | घटनास्थळ, जप्ती पंचनाम्याचे व रासायनिक विश्लेषनासाठी नमुना घेतल्याचे पंच साक्षीदार | १० |
| ०२ | नागेश ओंकार इंगळे | घटनास्थळ, जप्ती पंचनाम्याचे व रासायनिक विश्लेषनासाठी नमुना घेतल्याचे पंच साक्षीदार | १२ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार**

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे साक्षीदार**

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## अ. अभियोग पक्षाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ब. बचाव पक्षाची निशाणी यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## क. न्यायालयाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ०२ | वकिलपत्र |
| ३. | ०८ | गुन्हयाचा सारांश व आरोपीचे निवेदन |

## ड. वस्तु/ मुद्देमाल यादी

| अनु.क्र. | वस्तु/ मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र.१३०/२०२४ | देशी दारु बॉबी संत्राच्या ४८ सिलबंद बाटल्या, १८० मि.ली. प्रत्येकी |

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.06.12 17:52:21 +0530

(पी. डी. देवरे)

दिनांक: १२/०६/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड).

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word as per the original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Karanja. |
| Date of Judgment | :- | 12.06.2026. |
| Judgment signed by P.O. | :- | 12.06.2026. |
| Judgment uploaded on | :- | 12.06.2026. |